**सं. फौ. ख. क्रं. १२३/२०२४**
**शासन वि. गजानन**
**नि. १० लगत**

MHYA130002452024

| |
|---|
| सं.फौ.ख.दाखल दिनांक ०५/०३/२०२४ |
| सं.फौ.ख.नोंद दिनांक ०५/०३/२०२४ |
| सं.फौ.ख.निकाल दिनांक २६/०५/२०२६ |
| कालावधी **०२ वर्षे ०२ महिने २१ दिवस** |

**न्यायनिर्णय**

( घोषित दिनांक २६/०५/ २०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२–अ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांबाबत संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

२. अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता श्री. ए. आर. राऊत व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. टी. साळवे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. प्रकरणातील मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्रं | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दि. ०७/०२/२०२४ रोजी १२.५० वाजण्याच्या सुमारास मौजे–संभाजीनगर, ता. दिग्रस, जि. यवतमाळ येथे आरोपी बेकायदेशीरीररित्या वरली मटका नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना मिळून आले आणि महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२–अ अन्वये गुन्हा केला ? | नाही |

| अ. क्रं | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २ | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## **का र ण मि मां सा**

४. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेला दोष सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार तपासले आहे. ते म्हणजे पंच साक्षीदार अभय रमेश गायकवाड (सा.क्र.१) हे आहेत.

**मुद्दा क्र. १ करिता :–**

५. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे (सा.क्र १) अभय रमेश गायकवाड हे जप्ती पंचनाम्यातील पंच साक्षीदार असुन त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील यांनी न्यायालयाच्या परवानगीने साक्षीदारास उलट तपासात विचारले जावु शकणारे प्रश्न विचारण्यात आले. मात्र अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काहीही त्यांनी सांगितले नाही. त्यामुळे अभियोग पक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत करु शकला नाही.

६. प्रस्तूत खटल्यात अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवूनही इतर साक्षीदारांचा पुरावा देण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. याउलट अभियोग पक्षाने नि. क्र. ०१ वर त्यांचा पुरावा बंद केल्याचे नमूद केले. अभियोग पक्षाने वर्दीदार

यांना तपासले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष वर्दी शाबीत करु शकला नाही. अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणातील आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभिप्रेत असणारा पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. उपरोक्त बाबींचा विचार करता आरोपीविरुध्द अभिलेखावर पुरेसा पुरावा न आल्याने संशयाचा फायदा आरोपीला जातो. म्हणून मी **मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्र. २ करिता :–**

७. वरील सर्व विवेचनावरुन व अभिलेखावरुन आलेल्या पुराव्यावरुन आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित ठरते. आरोपीने जप्त रक्कमेवर अधिकार सांगितलेला नाही. सबब सदर रक्कम शासनास जमा करणे योग्य होणार आहे. तसेच जप्त करण्यात आलेले जुगाराचे साहित्य मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर ते नष्ट करणे योग्य होणार आहे. सबब, मी मुददा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी– गजानन महादेव इंगळे यांची महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांसाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

**२.** आरोपीचे बंधपत्रे व जामीनपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

**३.** जप्त मुद्देमाल र.रु. ५८०/– हे शासन जमा करण्यात यावेत व जप्त मुददेमाल पत्ते हे अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावेत.

**४.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३, कलम ४८१(१), अन्वये आरोपीने रु. १५,०००/– चे बेल बॉन्ड जमा करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.05.26 15:36:15 +0530

स्थळ:दिग्रस
दि. २६/०५/२०२६

**(बा. ना. गोडबोले )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दिग्रस

सं. फौ. ख. क्रं. १२३/२०२४
शासन वि. गजानन
नि. १० लगत

:: **Certificate of Stenographer** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 26/05/2026.

Transcribed On : 26/05/2026

Checked & Signed On : 26/05/2026

Date : 26/05/2026
Place : Digras

**Sd/-**
**( Ku. N. S. Jadhao )**
Steno Grade-3
C.J.J.D. & J.M.F.C., Digras.